शेतकीव्यतिरिक्त सहकारी पतपेढ्यांच्या कारभाराची पाहणी करून त्या अधिक कार्यक्षम होण्यासाठी कोणते उपाय योजतां येतील याची शिफारस करण्यासाठी मध्यवर्ती समाज–विकास व सहकार खात्यानें एक अभ्यास–तुकडी नेमली आहे. मुंबईच्या सारस्वत को. बँकेचे श्री. वा. पुं. वर्दे हे तुकडीचे अध्यक्ष आहेत. अर्बन को- ऑपरेटिव्ह बँका व नोकरवर्गाच्या सहकारी बँका या-सुद्धां शेतकीव्यतिरिक्त सहकारी पतपेढ्यांची संघटना, स्वरूप व कार्य यांची पाहणी ही समिति करील. त्यांचा विकास होण्याच्या दृष्टीनें आवश्यक असलेल्या शिफारशीहि ही समिति करील. तसेंच, शेतकीव्यतिरिक्त सहकारी पतपेढ्या व इतर सहकारी बँका यांमधील सहकार्य अधिक वृद्धिंगत होण्यासाठी कोणते उपाय योजतां येतील त्याबाबतहि समिति सूचना करील. शेतकीव्यतिरिक्त सहकारी पतपेढ्यांत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका व नोकरवर्गाच्या सहकारी बँका यांचा समावेश होतो. या बँकांनीं कांहीं बाबतींत चांगलीच प्रगति केली आहे. परंतु सर्वच राज्यांत त्यांचा विकास एक-सारखा झालेला नाहीं. शहरांतील मध्यमवर्गाच्या कर्जविषयक गरजा भागविण्याचें ह्या बँका एक प्रमुख साधन असल्यानें त्यांच्या विकासास भरपूर वाव आहे.

## एस. संपत ह्यांचें बायर्स गाइड

### नवी आवृत्ति प्रसिद्ध होणार

श्री. संपत के. देसाई ह्यांनीं जानेवारी, १९६२ मध्यें आपलें ‘ बायर्स गाइड, १९६२–६३ ’ प्रसिद्ध केलें. तेव्हां संपादकांनीं मुख्यतः साखर–कारखान्यांच्या गरजा दृष्टीसमोर ठेवल्या होत्या. त्या गाइडची खरेदीदारांना उपयुक्तता इतकी पटली, कीं त्याची १९६४–६५ ची नवी आवृत्ति आतां लवकरच प्रसिद्ध होणार आहे. त्यामध्यें साखर कारखान्यांप्रमाणें इतरहि उद्योगधंद्यांच्या गरजांचा समावेश केला जाईल. उद्योगधंद्यांची वाढ होत असतांना त्यांना उपयुक्त अशी माहिती एकत्रित करून मिळाली तर ती फारच फायद्याची होते. चालू बाजारपेठा, कारखानदारांचीं नांवें, व्यापारी एजन्सीजचीं नांवें, उद्योगपतींना, तंत्रज्ञांना व इंजीनि-अर्सना उपयुक्त अशी तांत्रिक माहिती, विश्वासार्ह परदेशी फर्म्सचीं नांवें, परदेशी कोलॅबोरेशन, भारतांतील साखर कारखा-न्यांची यादी व त्या व्यवसायांतील लोकांची माहिती, इत्यादि नव्या आवृत्तीचीं वैशिष्ट्यें राहतील. बायर्स गाइडविषयीं अधिक तपशील त्याचे संपादक श्री. संपत के. शिंदे, शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली, ह्यांचेकडून मिळूं शकेल.

## लडाखच्या विकासाची योजना

लडाख भागाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी एक कोटी रुपये खर्चाचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. सर्व ऋतूंत उपयोगी पडणारा श्रीनगर–लेह रस्ता तयार झाल्यापासून लडाखची आर्थिक प्रगति साधणें अधिक सोपें झालें आहे. कार्यक्रमांत उंचीवरील भागांत शेती करणें, शेतकऱ्यांना चांगलें बीं–बियाणें व खतें पुरविणें, जमिनीची धूप थांबविणें, पशुधनाचें संवर्धन करणें इत्यादि बाबींचा समावेश आहे. त्याशिवाय लडाखमधील दुर्गम प्रदेशांतहि आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देणें आणि मुलां-साठी व मुलींसाठी शाळा स्थापन करणें, हींहि कामें करण्यांत येतील.


डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाताबागेसमोर, पुणें २.

नवीन वर्षाकरितां बुधवार दि. २६ जून १९६३ पासून उघडेल

जी. सी. डी., डी. कॉम., एल. सी. सी., जी. डी. सी. अॅन्ड ए, कॉस्टिंग, कंपनी सेक्रेटरी, एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री, एक्स्टर्नल स्पेशल बी. कॉम. डिग्री., अकौंटन्सी, शॉर्टहॅन्ड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग, व बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

★रु. १२०० पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठीं जी. सी. डी., जी. डी. सी. ए., शॉर्टहँड व टाइपरायटिंग कोर्ससाठी सरकारी फ्रीशिप्स.

★सकाळ-संध्याकाळचे वर्ग.

★ इंग्रजी व मराठी माध्यम.

★बँकेंत नोकरी करणाऱ्या व करूं इच्छिणाऱ्यासाठी ३ महिन्यांचा बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

—माहितीपत्रक किंमत २० नवे पैसे—



माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

## श्री. के. बी. रोहमारे,

### चेअरमन,

### अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अहमदनगर.

नुकतेंच नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन झालेले आमदार के. बी. रोहमारे, यांची कर्तृत्वाची कारकीर्द कोपरगांव तालुक्यांतल्या पोहेगांवसारख्या एका छोट्याशा खेड्यांतून सुरू झाली. यांचा जन्म २३ मार्च १९२५ रोजीं मढी येथें त्यांच्या मामाच्या घरीं झाला. १९४४ सालीं नाशिक येथील हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले.



शालेय जीवनाच्या कालखंडांतच ४२ साल आले. आणि त्या चलवळींत त्यांना पहिला तुरुंगवास घडला. मॅट्रिक झाल्यानंतर घरची वडलार्जित शेती बघतां बघतां ते गांवकीच्या कार्यक्षेत्रांत लक्ष घालूं लागले. सुरुवातीला ते पोहेगांवच्या सोसायटींत पंच म्हणून काम पाहूं लागले. त्याच्यानंतर ते १९५२–५३ सालीं पोहेगांवच्या ग्रामपंचायतीचे सरपंच होते. आज त्याच गांवांत पाणी-पुरवठा योजना अंमलांत येण्याच्या वाटेवर आहे, ती केवळ के. बी. साहेबांच्यामुळें. गांवांत प्रथम एकच सोसायटी होती. पण तिचें कार्यक्षेत्र अपुरें पडत असल्यानें त्यांनीं स्वत: एक नवीन सोसायटी काढली. त्या सोसायटीचे आजतागायत एक जबाबदार पंच म्हणून ते काम पाहात आहेत.

कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचें व तसेंच संजीवनी सहकारी साखर कारखान्यानें शेअर भांडवल गोळा करतांना त्यांनीं अतोनात श्रम घेतले. जिनिंग प्रेसिंगच्या उभारणीसाठी त्यांनीं केलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा तर कोपरगांव तालुक्यांतला प्रत्येक शेतकरी जाणत आहे.

खाजगी सावकारीनें गांजलेल्या लोकांना त्यांनीं आपल्या सोसायटीमार्फत शेतीला लागणारी हरतऱ्हेची मदत देऊन सावकारशाहीपासून होणारा त्यांचा त्रास बंद केला. या बाबतींत त्यांना बराच विरोध सहन करावा लागला.

गेल्या चार वर्षांपासून ते गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी–विक्री संघाचे चेअरमन आहेत. त्यांच्या कारकीर्दींत संघानें खूपशी प्रगति केली आहे. या खरेदी–विक्री संघामुळें शेतकऱ्यांचा अतोनात फायदा झाला आहे आणि होतहि आहे.

के. बी. ना या भागांत के. बी. दादा या घरगुती नांवानें लोक ओळखतात. त्यांचीं वैशिष्ट्यें म्हणजे ते अत्यंत निस्पृह आणि निर्व्यसनी आहेत. ‘रोख ठोक’पणा हा त्यांचा स्थायीभाव आहे. ‘बघतों,’ ‘करतों,’ ‘सांगतों’ अशा बुळबुळीत आणि गुळमुळीत शब्दांचा संपर्क त्यांना नाहीं. सरळ आणि स्पष्ट हा त्यांचा स्वभाव. प्रखर विरोधावर प्रभावीपणें मात करावी ती त्यांनींच. एक चतुर संघटक म्हणून त्यांचें नगर जिल्ह्यांतले स्थान फार वरचें आहे.

के. बी. दादांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वटवृक्षाला आज अनेक पदांच्या पारंब्या फुटलेल्या आहेत. ते नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तसेंच गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन आहेत. कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचे आणि संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे ते डायरेक्टर आहेत. महाराष्ट्र स्टेट कोऑ. मार्केटिंग सोसायटीवर डायरेक्टर म्हणून त्यांची नियुक्ति झालेली आहे. आमदार झाल्यापासून कोपरगांव तालुक्याची सारी मदार त्यांच्यावर आहे.

---

### छोट्या औद्योगिक कारखान्यांस स्टेट बँकेचीं कर्जें

मार्च १९६३ ला संपलेल्या वर्षांत स्टेट बँक ऑफ इंडियानें छोट्या औद्योगिक कारखान्यांस एकूण १३०२·२० लाख रुपयांचीं कर्जें दिलीं. मार्च १९६२ ला संपलेल्या वर्षाचा हा आंकडा १०३८·२७ लाख रुपये होता. त्याचप्रमाणें हीं कर्जें मिळालेल्या कारखान्यांची संख्याहि या कालांत २९१७ वरून ३२८९ वर गेली.

---

### चित्रपट निर्मात्यांच्या कर्जांची परतफेड

सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. मेहबूब खान, ह्यांनीं “चित्रपट-निर्मात्यांना दिलेला पैसा परत मिळणें अशक्य आहे” असें विधान फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशननें दिलेल्या कर्जाबाबत केलें होतें. कॉर्पोरेशननें एक पत्रक काढून पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे, “श्री. मेहबूब खान ह्यांचें विधान वस्तुस्थितीस धरून नाहीं. कॉर्पोरेशननें ३३ निर्मात्यांना ९८ लक्ष रु. चीं कर्जें मंजूर केलीं असून त्यांपैकी १९ निर्मात्यांना ४० लक्ष रु. चीं कर्जें प्रत्यक्ष देण्यांत आलीं आहेत. ह्या कर्जांच्या मदतीनें पांच चित्रपट पुरे होऊन दाखविण्यास प्रारंभ झाला आहे. निर्मात्यांनीं ९ लक्ष रुपयांची कर्जफेड केली आहे. १९६२–६३ मध्येंच बहुतेक कर्जें दिलेलीं आहेत; तेव्हां चालू वर्षांत परतफेड अधिक होईल अशी अपेक्षा आहे.”

---

### श्रीरामपूर येथील सहकारी सूत गिरणी

ऐंशी लाख रुपये प्राथमिक भांडवलावर श्रीरामपूर शहरांत स्थापन व्हावयाच्या सहकारी सूत गिरणीच्या यंत्रसामग्रीची ऑर्डर सरकारतर्फे रवाना झाली असून १० लाख रुपयांची ब्रिटिश यंत्रसामग्री व ३ लाख रुपयांची अमेरिकन कोंबिंग मशिनरी मागविण्यांत आली आहे. याशिवाय भारतांतून २२ लाख रुपयांची देशी मशिनरीहि खरेदी करण्यांत येणार आहे. श्रीरामपूरच्या सहकारी सूत गिरणीची उभारणी ब्रिटिश तज्ज्ञ करणार असून प्रत्यक्ष उत्पादन १८ महिन्यांत सुरू होईल. सूत गिरणी एअर कंडिशन्ड होणार आहे.

महाराष्ट्रांत श्रीरामपूर, अमरावती, नांदेड, भुसावळ व नागपूर या पांचहि ठिकाणीं एकाच वेळीं सहकारी सूत गिरण्यांची उभारणी होणार होती. पण प्राथमिक पूर्वतयारीच्या दृष्टीनें श्रीरामपूर व अमरावतीनें आघाडी मारल्यानें त्यांच्या ऑर्डर्स रवाना झाल्या. इतरांच्या मशिनरीच्या ऑर्डर्स पूर्वतयारीनंतर जाणार आहेत. श्रीरामपूरच्या सहकारी सूत गिरणीची उभारणी कॉटन सेल सोसायटीमार्फत होणार आहे. या गिरणींत ४० ते ६० नंबरचें तलम सुताचे उत्पादन करण्याचा संचालक मंडळाचा विचार आहे. सरकारनें श्रीरामपूरचे सहकारी सूत गिरणीसाठी कोयनेची ७०० किलोवॅट वीज जून १९६४ पासून देण्याचें मान्य केलें असून इरिगेशन खात्यानेंहि कॅनॉलमधून पाणी देण्याचें मान्य केलें आहे. गिरणीचे उभारणीसाठींहि सरकारकडून ६० एकर जागा पसंत करण्यांत आली आहे. सूत गिरणीस शेतकऱ्यांचें प्रचंड सहकार्य लाभल्यानें शेअर भांडवल यापूर्वींच जमा झालें आहे व सरकार आणि बँकेकडून संकल्पित कर्जाचीहि तरतूद झाली आहे.

## श्री. के. बी. रोहमारे,
### चेअरमन,
### अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अहमदनगर.

नुकतेंच नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन झालेले आमदार के. बी. रोहमारे, यांची कर्तृत्वाची कारकीर्द कोपरगांव तालुक्यांतल्या पोहेगांवसारख्या एका छोट्याशा खेड्यांतून सुरू झाली. यांचा जन्म २३ मार्च १९२५ रोजीं मढी येथें त्यांच्या मामाच्या घरीं झाला. १९४४ सालीं नाशिक येथील हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले.



शालेय जीवनाच्या कालखंडांतच ४२ साल आले. आणि त्या चलवळींत त्यांना पहिला तुरुंगवास घडला. मॅट्रिक झाल्यानंतर घरची वडलार्जित शेती बघतां बघतां ते गांवकीच्या कार्यक्षेत्रांत लक्ष घालूं लागले. सुरुवातीला ते पोहेगांवच्या सोसायटींत पंच म्हणून काम पाहूं लागले. त्याच्यानंतर ते १९५२–५३ सालीं पोहेगांवच्या ग्रामपंचायतीचे सरपंच होते. आज त्याच गांवांत पाणी-पुरवठा योजना अंमलांत येण्याच्या वाटेवर आहे, ती केवळ के. बी. साहेबांच्यामुळें. गांवांत प्रथम एकच सोसायटी होती. पण तिचें कार्यक्षेत्र अपुरें पडत असल्यानें त्यांनीं स्वत: एक नवीन सोसायटी काढली. त्या सोसायटीचे आजतागायत एक जबाबदार पंच म्हणून ते काम पाहात आहेत.

कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचें व तसेंच संजीवनी सहकारी साखर कारखान्याचें शेअर भांडवल गोळा करतांना त्यांनीं अतोनात श्रम घेतले. जिनिंग प्रेसिंगच्या उभारणीसाठी त्यांनीं केलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा तर कोपरगांव तालुक्यांतला प्रत्येक शेतकरी जाणत आहे.

खाजगी सावकारीनें गांजलेल्या लोकांना त्यांनीं आपल्या सोसायटीमार्फत शेतीला लागणारी हरतऱ्हेची मदत देऊन सावकारशाहीपासून होणारा त्यांचा त्रास बंद केला. या बाबतींत त्यांना बराच विरोध सहन करावा लागला.

गेल्या चार वर्षांपासून ते गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी–विक्री संघाचे चेअरमन आहेत. त्यांच्या कारकीर्दींत संघानें खूपशी प्रगति केली आहे. या खरेदी–विक्री संघामुळें शेतकऱ्यांचा अतोनात फायदा झाला आहे आणि होतहि आहे.

के. बी. ना या भागांत के. बी. दादा या घरगुती नांवानें लोक ओळखतात. त्यांचीं वैशिष्ट्यें म्हणजे ते अत्यंत निस्पृह आणि निर्व्यसनी आहेत. ' रोख ठोक 'पणा हा त्यांचा स्थायीभाव आहे. 'बघतों,' 'करतों,' 'सांगतों' अशा बुळबुळीत आणि गुळमुळीत शब्दांचा संपर्क त्यांना नाहीं. सरळ आणि स्पष्ट हा त्यांचा स्वभाव. प्रखर विरोधावर प्रभावीपणें मात करावी ती त्यांनींच. एक चतुर संघटक म्हणून त्यांचें नगर जिल्ह्यांतले स्थान फार वरचें आहे.

के. बी. दादांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वटवृक्षाला आज अनेक पदांच्या पारंब्या फुटलेल्या आहेत. ते नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तसेंच गोदावरी प्रवरा कॅनॉल सहकारी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन आहेत. कोपरगांव सहकारी साखर कारखान्याचे आणि संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे ते डायरेक्टर आहेत. महाराष्ट्र स्टेट कोऑ. मार्केटिंग सोसायटीवर डायरेक्टर म्हणून त्यांची नियुक्ति झालेली आहे. आमदार झाल्यापासून कोपरगांव तालुक्याची सारी मदार त्यांच्यावर आहे.

---

### छोट्या औद्योगिक कारखान्यांस स्टेट बँकेचीं कर्जें

मार्च १९६३ ला संपलेल्या वर्षांत स्टेट बँक ऑफ इंडियानें छोट्या औद्योगिक कारखान्यांस एकूण १३०२·२० लाख रुपयांचीं कर्जें दिलीं. मार्च १९६२ ला संपलेल्या वर्षाचा हा आंकडा १०३८·२७ लाख रुपये होता. त्याचप्रमाणें हीं कर्जें मिळालेल्या कारखान्यांची संख्याहि या कालांत २९१७ वरून ३२८९ वर गेली.

---

### चित्रपट निर्मात्यांच्या कर्जांची परतफेड

सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. मेहबूब खान, ह्यांनीं " चित्रपट-निर्मात्यांना दिलेला पैसा परत मिळणें अशक्य आहे " असें विधान फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशननें दिलेल्या कर्जांबाबत केलें होतें. कॉर्पोरेशननें एक पत्रक काढून पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे, " श्री. मेहबूब खान ह्यांचें विधान वस्तुस्थितीस धरून नाहीं. कॉर्पोरेशननें ३३ निर्मात्यांना ९८ लक्ष रु. चीं कर्जें मंजूर केलीं असून त्यांपैकी १९ निर्मात्यांना ४० लक्ष रु. चीं कर्जें प्रत्यक्ष देण्यांत आलीं आहेत. ह्या कर्जांच्या मदतीनें पांच चित्रपट पुरे होऊन दाखविण्यास प्रारंभ झाला आहे. निर्मात्यांनीं ९ लक्ष रुपयांची कर्जफेड केली आहे. १९६२–६३ मध्येंच बहुतेक कर्जें दिलेलीं आहेत; तेव्हां चालू वर्षांत परतफेड अधिक होईल अशी अपेक्षा आहे."

---

### श्रीरामपूर येथील सहकारी सूत गिरणी

ऐंशी लाख रुपये प्राथमिक भांडवलावर श्रीरामपूर शहरांत स्थापन व्हावयाच्या सहकारी सूत गिरणीच्या यंत्रसामग्रीची ऑर्डर सरकारतर्फे रवाना झाली असून १० लाख रुपयांची ब्रिटिश यंत्रसामग्री व ३ लाख रुपयांची अमेरिकन कोंबिंग मशिनरी मागविण्यांत आली आहे. याशिवाय भारतांतून २२ लाख रुपयांची देशी मशिनरीहि खरेदी करण्यांत येणार आहे. श्रीरामपूरच्या सहकारी सूत गिरणीची उभारणी ब्रिटिश तज्ज्ञ करणार असून प्रत्यक्ष उत्पादन १८ महिन्यांत सुरू होईल. सूत गिरणी एअर कंडिशन्ड होणार आहे.

महाराष्ट्रांत श्रीरामपूर, अमरावती, नांदेड, भुसावळ व नागपूर या पांचहि ठिकाणीं एकाच वेळीं सहकारी सूत गिरण्यांची उभारणी होणार होती. पण प्राथमिक पूर्वतयारीच्या दृष्टीनें श्रीरामपूर व अमरावतीनें आघाडी मारल्यानें त्यांच्या ऑर्डर्स रवाना झाल्या. इतरांच्या मशिनरीच्या ऑर्डर्स पूर्वतयारीनंतर जाणार आहेत. श्रीरामपूरच्या सहकारी सूत गिरणीची उभारणी कॉटन सेल सोसायटीमार्फत होणार आहे. या गिरणींत ४० ते ६० नंबरचें तलम सुताचे उत्पादन करण्याचा संचालक मंडळाचा विचार आहे. सरकारनें श्रीरामपूरचे सहकारी सूत गिरणीसाठी कोयनेची ७०० किलोवॅट वीज जून १९६४ पासून देण्याचें मान्य केलें असून इरिगेशन खात्यानेंहि कॅनॉलमधून पाणी देण्याचें मान्य केलें आहे. गिरणीचे उभारणीसाठींहि सरकारकडून ६० एकर जागा पसंत करण्यांत आली आहे. सूत गिरणीस शेतकऱ्यांचें प्रचंड सहकार्य लाभल्यानें शेअर भांडवल यापूर्वींच जमा झालें आहे व सरकार आणि बँकेकडून संकल्पित कर्जाचीहि तरतूद झाली आहे.

### पोलादाच्या कारखान्यांतील उत्पादनाचा खर्च

भारत सरकारच्या पोलाद आणि भारी उद्योगधंद्यांच्या खात्याचे उपमंत्री श्री. पी. सी. सेठी ह्यांनीं सार्वजनिक मालकीच्या पोलाद कारखान्यांसंबंधीं कांहीं माहिती जाहीर केली आहे. इंदूर येथें बोलतांना ते म्हणाले कीं, सार्वजनिक मालकीच्या विभागांतील पोलादाच्या कारखान्यांतील उत्पादनाचा खर्च १५ टक्के कमी करण्याचें उद्दिष्ट सरकारनें निश्चित केलें आहे. त्याचप्रमाणें ह्या कारखान्यांतून उत्पादन करण्यांत येणाऱ्या पोलादाच्या दर्जाकडे अधिक लक्ष देण्यांत येणार आहे. सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांतील उत्पादन आतां त्यांच्या संपूर्ण उत्पादनक्षमतेइतकें होऊं लागलेलें आहे. त्यांची १०० टक्के उत्पादनक्षमता आतां कारणीं लावण्यांत येऊं लागलेली आहे. सर्व कारखान्यांतून मिळून दरमहा ५ लाख टनाचे पोलादाचे ठोकळे तयार होऊं शकतील, असा अंदाज करण्यांत आलेला होता. तो प्रत्यक्षांत बरोबर ठरला आहे. सार्वजनिक मालकीच्या पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करून त्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. भिलई येथील कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २५ लाख टनांवरून ३५ लाख टनांपर्यंत नेण्याचा विचार आहे. रूरकेला येथील कारखान्याचें वार्षिक उत्पादन १८ लाख टनांवरून २५ लाख टनांपर्यंत आणि दुर्गापूर येथील कारखान्याचें उत्पादन १६ लाख टनांवरून ३० लाख टनांपर्यंत वाढविण्याचा विचार आहे. ही संकल्पित उत्पादनवाढ चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत येणार आहे. बोकॅरो येथील ४ थ्या कारखान्याची प्रारंभींची उत्पादनक्षमता १४ लाख टन असेल.

---

### मध्यप्रदेशांतील अल्युमिनमचा कारखाना

मध्यप्रदेशांत काढण्यांत यावयाच्या अल्युमिनमच्या कारखान्याचा तपशील ठरविण्यासाठी कांहीं हंगेरिअन तज्ज्ञ भारतांत आले आहेत. ह्या कारखान्याचा प्राथमिक अहवाल हिंदी तंत्रज्ञांनीं तयार केलेला आहे. कारखाना उभारण्याच्या कामीं हंगेरियन सरकार आर्थिक व तांत्रिक साह्य देणार आहे. भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं हंगेरीला नुकतीच भेट दिली होती. त्या वेळीं कारखान्याबाबत सहकार्य करण्याचा करार करण्यांत आला. कारखान्यांत दरसाल ८०,००० टन अल्युमिनमचें उत्पादन करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणखी एक अल्युमिनमचा कारखाना मंगलोर येथें स्थापन करण्यांत येणार आहे. तो खाजगी मालकीच्या विभागांत असून दरसाल ५०,००० टन अल्युमिनम निर्माण करूं शकेल.

### भारतांतील जॉइण्ट स्टॉक कंपन्यांची यादी

मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या कंपनी कायदा प्रशासनाच्या कचेरीनें भारतांतील ३१ मार्च १९५९ पर्यंतच्या जॉइण्ट स्टॉक कंपन्यांची वर्णाक्षरक्रमानुसार एक यादी तयार केली असून, एका स्वतंत्र पुरवणींत ३१ मार्च १९६२ पर्यंतच्या अशा कंपन्यांची यादी दिली आहे. ४० रु. किंमतीच्या या प्रकाशनाचीं दोन पुस्तकें असून तें ऑफिस ऑफ दि रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, महाराष्ट्र, एव्हरेस्ट बिल्डिंग, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-२ येथें मिळूं शकेल. या प्रकाशनांत कंपन्या, व्यापारी संस्था, सॉलिसिटर्स व चार्टर्ड अकाउंटंटस यांस उपयुक्त अशी माहिती देण्यांत आली आहे. सदर प्रकाशनांत कंपन्यांच्या नांवाबरोबरच त्यांच्या रजिस्टर्ड कचेऱ्या, भांडवलगुंतवणूक इत्यादीविषयीं माहिती देण्यांत आली आहे.

---

### पवनचक्क्यांच्या साह्यानें विजेची निर्मिति

बंगलोर येथील नॅशनल एरोनॉटिकल लॅबोरेटरी ह्या संशोधन संस्थेनें केलेल्या पाहणीवरून असें आढळून आलें आहे कीं, भारतांत अनेक ठिकाणीं पवनचक्क्यांच्या साह्यानें वीज निर्माण करतां येणें शक्य आहे. वाऱ्याच्या वेगाचा उपयोग करून २ ते ५ किलोवॅट वीज निर्माण करणारे जनरेटर्स ह्या कामीं चांगले उपयुक्त ठरतील. देशी साधनांचा उपयोग करून संस्थेनें दोन प्रकारच्या पवनचक्क्या बनविल्या आहेत. त्यांपैकीं एक वेगानें वाहणाऱ्या वाऱ्याच्या ठिकाणीं बसवितां येण्यासारखी आणि दुसरी बेताच्या वायुवेगावर वापरतां येण्यासारखी आहे. विद्युतनिर्मितीसाठी वाऱ्याचा उपयोग करणाऱ्या परदेशी चक्क्याहि आयात करण्यांत आल्या असून त्यांच्या साह्यानें कांहीं प्रयोग करण्यांत येत आहेत. म्हैसूर व महाराष्ट्रांतील ३० खेड्यांतून पवनचक्क्यांच्या साह्यानें पाणी खेचण्यांत येत आहे.

---

### रासायनिक धंद्याकडे अधिक लक्ष

रशिअन सरकारनें आपल्या रासायनिक उद्योगधंद्यांकडे अधिक लक्ष देण्याचें ठरविलें आहे. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी आणि नित्योपयोगी वस्तु निर्माण करण्यासाठी ह्या धंद्यांत अधिक भांडवल गुंतविण्यांत येणार आहे. शेतीसाठी लागणारीं रासायनिक खतें आणि पिकांवरील कीड नाहींशी करणारीं औषधें ह्यांची रशियांतील शेतीला अतिशय गरज आहे. रशिअन संघराज्यांतील घटक राज्यांच्या मुख्य प्रधानांची व तज्ज्ञांची एक परिषद् नुकतीच भरविण्यांत आली. परिषदेंत रासायनिक उद्योगधंद्यांसाठी १९६४-६५ सालाचा नवा कार्यक्रम आंखण्यांत आला.



## पोलादाच्या कारखान्यांतील उत्पादनाचा खर्च

भारत सरकारच्या पोलाद आणि भारी उद्योगधंद्यांच्या खात्याचे उपमंत्री श्री. पी. सी. सेठी ह्यांनीं सार्वजनिक मालकीच्या पोलाद कारखान्यांसंबंधीं कांहीं माहिती जाहीर केली आहे. इंदूर येथें बोलतांना ते म्हणाले कीं, सार्वजनिक मालकीच्या विभागांतील पोलादाच्या कारखान्यांतील उत्पादनाचा खर्च १५ टक्के कमी करण्याचें उद्दिष्ट सरकारनें निश्चित केलें आहे. त्याचप्रमाणें ह्या कारखान्यांतून उत्पादन करण्यांत येणाऱ्या पोलादाच्या दर्जाकडे अधिक लक्ष देण्यांत येणार आहे. सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांतील उत्पादन आतां त्यांच्या संपूर्ण उत्पादनक्षमतेइतकें होऊं लागलेलें आहे. त्यांची १०० टक्के उत्पादनक्षमता आतां कारणीं लावण्यांत येऊं लागलेली आहे. सर्व कारखान्यांतून मिळून दरगहा ५ लाख टनाचे पोलादाचे ठोकळे तयार होऊं शकतील, असा अंदाज करण्यांत आलेला होता. तो प्रत्यक्षांत बरोबर ठरला आहे. सार्वजनिक मालकीच्या पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करून त्यांची उत्पादनक्षमता वाढविण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. भिलई येथील कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २५ लाख टनांवरून ३५ लाख टनांपर्यंत नेण्याचा विचार आहे. रूरकेला येथील कारखान्याचें वार्षिक उत्पादन १८ लाख टनांवरून २५ लाख टनांपर्यंत आणि दुर्गापूर येथील कारखान्याचें उत्पादन १६ लाख टनांवरून ३० लाख टनांपर्यंत वाढविण्याचा विचार आहे. ही संकल्पित उत्पादनवाढ चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत येणार आहे. बोकॅरो येथील ४ थ्या कारखान्याची प्रारंभींची उत्पादनक्षमता १४ लाख टन असेल.

## मध्यप्रदेशांतील अल्युमिनमचा कारखाना

मध्यप्रदेशांत काढण्यांत यावयाच्या अल्युमिनमच्या कारखान्याचा तपशील ठरविण्यासाठीं कांहीं हंगेरिअन तज्ज्ञ भारतांत आले आहेत. ह्या कारखान्याचा प्राथमिक अहवाल हिंदी तंत्रज्ञांनीं तयार केलेला आहे. कारखाना उभारण्याच्या कामीं हंगेरियन सरकार आर्थिक व तांत्रिक साह्य देणार आहे. भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं हंगेरीला नुकतीच भेट दिली होती. त्या वेळीं कारखान्याबाबत सहकार्य करण्याचा करार करण्यांत आला. कारखान्यांत दरसाल ८०,००० टन अल्युमिनमचें उत्पादन करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणखी एक अल्युमिनमचा कारखाना मंगलोर येथें स्थापन करण्यांत येणार आहे. तो खाजगी मालकीच्या विभागांत असून दरसाल ५०,००० टन अल्युमिनम निर्माण करूं शकेल.

## भारतांतील जॉइण्ट स्टॉक कंपन्यांची यादी

मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या कंपनी कायदा प्रशासनाच्या कचेरीनें भारतांतील ३१ मार्च १९५९ पर्यंतच्या जॉईण्ट स्टॉक कंपन्यांची वर्णाक्षरक्रमानुसार एक यादी तयार केली असून, एका स्वतंत्र पुरवणींत ३१ मार्च १९६२ पर्यंतच्या अशा कंपन्यांची यादी दिली आहे. ४० रु. किंमतीच्या या प्रकाशनाचीं दोन पुस्तकें असून तें ऑफिस ऑफ दि रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, महाराष्ट्र, एव्हरेस्ट बिल्डिंग, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-२ येथें मिळूं शकेल. या प्रकाशनांत कंपन्या, व्यापारी संस्था, सॉलिसिटर्स व चार्टर्ड अकाउंटंटस यांस उपयुक्त अशी माहिती देण्यांत आली आहे. सदर प्रकाशनांत कंपन्यांच्या नांवाबरोबरच त्यांच्या रजिस्टर्ड कचेऱ्या, भांडवलगुंतवणूक इत्यादींविषयीं माहिती देण्यांत आली आहे.

## पवनचक्क्यांच्या साह्यानें विजेची निर्मिति

बंगलोर येथील नॅशनल एरोनॉटिकल लॅबोरेटरी ह्या संशोधन संस्थेनें केलेल्या पाहणीवरून असें आढळून आलें आहे कीं, भारतांत अनेक ठिकाणीं पवनचक्क्यांच्या साह्यानें वीज निर्माण करतां येणें शक्य आहे. वाऱ्याच्या वेगाचा उपयोग करून २ ते ५ किलोवॅट वीज निर्माण करणारे जनरेटर्स ह्या कामीं चांगले उपयुक्त ठरतील. देशी साधनांचा उपयोग करून संस्थेनें दोन प्रकारच्या पवनचक्क्या बनविल्या आहेत. त्यांपैकीं एक वेगानें वाहणाऱ्या वाऱ्याच्या ठिकाणीं बसवितां येण्यासारखी आणि दुसरी बेताच्या वायुवेगावर वापरतां येण्यासारखी आहे. विद्युत्‌निर्मितीसाठी वाऱ्याचा उपयोग करणाऱ्या परदेशी चक्क्याहि आयात करण्यांत आल्या असून त्यांच्या साह्यानें कांहीं प्रयोग करण्यांत येत आहेत. म्हैसूर व महाराष्ट्रांतील ३० खेड्यांतून पवनचक्क्यांच्या साह्यानें पाणी खेचण्यांत येत आहे.

## रासायनिक धंद्याकडे अधिक लक्ष

रशिअन सरकारनें आपल्या रासायनिक उद्योगधंद्यांकडे अधिक लक्ष देण्याचें ठरविलें आहे. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी आणि नित्योपयोगी वस्तु निर्माण करण्यासाठी ह्या धंद्यांत अधिक भांडवल गुंतविण्यांत येणार आहे. शेतीसाठी लागणारीं रासायनिक खतें आणि पिकांवरील कीड नाहींशी करणारीं औषधें ह्यांची रशियांतील शेतीला अतिशय गरज आहे. रशिअन संघराज्यांतील घटक राज्यांच्या मुख्य प्रधानांची व तज्ज्ञांची एक परिषद् नुकतीच भरविण्यांत आली. परिषदेंत रासायनिक उद्योगधंद्यांसाठी १९६४-६५ सालाचा नवा कार्यक्रम आंखण्यांत आला.

किर्लोस्कर शेंगा यंत्रें
•"कॉटेज" हॅन्ड शेंगायंत्र
•"कल्याण" हॅन्ड व पॉवर शेंगायंत्र
•"कल्याण" पॉवर शेंगायंत्र
• घरगुती उपयोगासाठीं
• व्यापारासाठीं
• तेल गिरण्यासाठीं

उत्कृष्ट प्रकारची यंत्रसामुग्री असणें हे आपल्या उद्योगधंद्याच्या वाढत्या प्रगतीचे चिन्ह आहे. आणि येवढ्यासाठीं शेतकरी, व्यापारी आणि कारखानदार हे आपल्या उद्योगधंद्यासाठीं किर्लोस्कर शेंगा यंत्राचीच निवड अधिक पसंत करतात. यामुळें कामाचा जलद उरक, खर्चात बचत व मालाचा उठाव असा त्यांचा तिहेरी फायदा होतो.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड किर्लोस्करवाडी जि. सातारा

### प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची सर्व राज्यांत प्रगति

प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांचा सर्वच राज्यांत विकास होत आहे. १९५७-५८ मध्यें प्राथमिक ग्राहक सरकारी संस्था ३,४३५ होती तीं वाढून १९६१-६२ मध्यें ७,२८१ वर गेली. ग्राहक सहकारी भांडारांची संख्या महाराष्ट्रांत सर्वांत अधिक म्हणजे १,१४५ असून त्याखालोखाल मद्रास राज्याचा क्रम ( ९३२ ) लागतो.

उपलब्ध असलेल्या आंकडेवारीप्रमाणें या भांडारांची सदस्य-संख्या १०·९ लक्ष आहे. प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांच्या भागभांडवलांतहि या काळांत वाढ होऊन तें २·१३ कोटींवरून २·६५ कोटींवर गेलें. यांपैकी एकपंचमांशपेक्षा अधिक म्हणजे ५३·४१ लक्ष रुपये भागभांडवल महाराष्ट्र राज्यांतील सहकारी संस्थांचें आहे.

या सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलांतहि वाढ होऊन तें ७·१२ कोटी रुपयांवरून ९·२० कोटी रुपयांवर गेलें. ग्राहक सहकारी संस्थांकडून होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या विक्रींतहि या काळांत वाढ होऊन ती २२·६ कोटी रुपयांवर गेली. यांपैकी मद्रास मधील सहकारी संस्थांनीं सर्वांत अधिक म्हणजे १० कोटी रु· किंमतीचा माल विकला, तर महाराष्ट्रांत त्याखालोखाल म्हणजे ८ कोटी रु. विक्री झाली.

त्याखेरीज प्राथमिक खरेदी-विक्री सहकारी संस्थांनीं ग्रामीण विभागांत १६ कोटी रु. किंमतीच्या मालाची विक्री केली. महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांत या संस्थांचें कार्य विशेष जोरदार आहे. या संस्थांची संख्या एकूण सुमारें २५०० आहे.

सन १९६०-६१ मध्यें प्राथमिक शेतकी सहकारी पतपेढ्यांनीं १७ कोटी रु. किंमतीच्या व बिगर-शेतकी सहकारी पतपेढ्यांनीं ५ कोटी रु. किंमतीच्या जीवनावश्यक वस्तूंची व मालाची विक्री केली.

### इतिहासकाराचा गंभीर इशारा

वॉशिंग्टन येथें भरलेल्या जागतिक अन्न काँग्रेसला १०० देशांचे मिळून एक हजार प्रतिनिधि आले होते. काँग्रेसमध्यें भाषण करतांना सुप्रसिद्ध इतिहासकार प्रा. आर्नोल्ड टॉयनबी म्हणाले कीं, मनुष्य जातीची भुकेपासून सुटका करण्याचे प्रयत्न चालूं आहेत. परंतु असंख्य पतिपत्नींनीं अपत्यांची संख्या स्वेच्छेनें मर्यादित करण्याचें ठरविल्याखेरीज ह्या प्रयत्नांना कधींहि यश येणार नाहीं. बहुसंख्य लोकांना संततिनियमनाचें शिक्षण देण्यासाठी कित्येक पिढ्या लागतील.' ह्या अवधींत उपलब्ध शास्त्रीय ज्ञानाचा अन्नाचें उत्पादन व वांटणी करण्याच्या कामीं उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे. मात्र राजकारणामुळें शास्त्राची गळचेपी होतां कामा नये. पृथ्वीचा भूभाग १०० किंवा अधिक सार्वभौम राष्ट्रांत सध्यांप्रमाणेंच विभागलेला राहिल्यास शास्त्रीय ज्ञानाचा उत्पादनाच्या कामीं उपयोग करतां येणार नाहीं. म्हणून अन्नाचें उत्पादन व वांटणी ह्यासाठी सर्व जगाची एकच संघटना करण्यांत आली पाहिजे.

### आतांपर्यंत ५८००० 'युवर ओन' टेलिफोन

'ओन युवर फोन' योजना देशांत १९५० मध्यें सुरू झाल्यापासून सदर योजनेनुसार ३० एप्रिल, १९६३ पर्यंत एकूण ५८,००० फोन बसविण्यांत आले. या योजनेनुसार वर्गणीदारांकडून डिपॉझिटची रक्कम एकूण १३·५० कोटी रुपयांवर गेली आहे.

### रेल्वेनें चालविलेल्या सर्व सहकारी पतपेढ्या नफ्यांत

देशांतील रेल्वेनें चालविलेल्या सहकारी पतपेढ्यांच्या कामकाजांत सतत सुधारणा होत आहे. देशांत सध्यां रेल्वेनें अशा २६ पतपेढ्या चालविल्या आहेत.

या पतपेढ्यांची सदस्यसंख्या १९६०-६१ मधील ६,४८,०८७ वरून १९६१-६२ मध्यें ६,६८,८३९ वर गेली. रेल्वे नोकरवर्गापैकी जवळजवळ ५४ टक्के नोकर या पतपेढ्यांचे सदस्य आहेत. या पतपेढ्यांपैकी कलकत्ता येथील दि साऊथ ईस्टर्न रेल्वे को-ऑपरेटिव्ह बँक लि. ही पतपेढी सर्वांत मोठी असून तिचें खेळतें भांडवल ६ कोटी रु. आहे.

अलीकडील कांहीं वर्षांत या पतपेढ्यांच्या भागभांडवलांत, खेळत्या भांडवलांत व राखीव निधींत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. या पतपेढ्यांचें भागभांडवल १९६०-६१ मधील ४.६३ कोटी रु. वरून १९६१-६२ मध्यें ५·११ कोटी रु. वर, खेळतें भांडवल ३०·४४ कोटी रु. वरून ३१·९७ कोटी रु. वर आणि ठेवी १३·१२ कोटी रु. वरून १५·५० कोटी रु. वर गेल्या.

या पतपेढ्यांच्या खेळत्या भांडवलांची उभारणी बहुतांशीं या पतपेढ्यांच्या सदस्यांच्या व इतरांच्या ठेवींमधून करण्यांत आली आहे. २० पतपेढ्यांतील बचत ठेवी ४·८८ कोटी रु. पर्यंत असल्याचें उपलब्ध आंकडेवारीवरून दिसून येतें. सक्तीच्या बचत ठेवींबरोबरच या पतपेढ्या कायम ठेवी व बचत ठेवींचाहि स्वीकार करतात. सदर पतपेढ्यांकडील रोख शिल्लक, आणि सहकारी व इतर रोख्यांत गुंतवलेली एकूण रक्कम २·५३ कोटी रु. अथवा त्यांजकडील ऐकूण ठेवींच्या ११·२ टक्के आहे. या पतपेढ्यांस १९६१-६२ मध्यें ३७ लाख रु. निव्वळ नफा झाला. सर्वच्यासर्व म्हणजे २६ पतपेढ्या नफ्यांत चालूं होत्या. यांपैकी २२ पतपेढ्यांनीं आपल्या नोकरवर्गास एकूण १ लाख रु. वर बोनस दिला.

### जंगली जनावरांना परदेशांची मागणी

हिंदच्या जंगलांतून वास्तव्य करणाऱ्या जनावरांना परदेशांतून चांगली मागणी येत आहे. ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, अफगाणिस्तान, मलाया व इतर कांहीं देश ह्यांतील प्राणिसंग्रहालयांना जंगली जनावरें पाहिजे आहेत. त्याशिवाय कांहीं सर्कसवाल्यांकडूनहि मागणी करण्यांत येत आहे. ब्रिटननें ३० हत्तींची मागणी केली आहे. अफगाणिस्तानच्या सरकारनें वाघांची मागणी केली आहे. त्याशिवाय कांहीं हत्ती, अस्वलें आणि सांबरें ह्यांनाहि निरनिराळ्या देशांकडून मागण्या आल्या आहेत. उत्तरप्रदेशमधील जंगलांतून ह्यांपैकी कांहीं प्राणी पकडण्यांत येणार आहेत. ह्या प्राण्यांच्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय चलनाची प्राप्ति होईल.

### रहदारीच्या नियमांच्या भंगाबद्दल अटक

कलकत्त्याच्या पोलिसांनीं केलेल्या पाहणीवरून असें आढळून आलें कीं, १९६२ सालीं कलकत्त्यांत ४,७०० लोक रस्त्यावरील अपघातांत सांपडून मृत्यु पावले अगर जखमी झाले. त्यांपैकी ७५ टक्के लोक पायानें चालणारे होते. पादचारी लोक रस्त्यावरून निष्काळजीपणें चालतात, अगर पदपथावरून एकदम रस्त्यावर येतात अगर वाटेल त्या ठिकाणीं रस्ता ओलांडतात. त्यामुळेंच बहुतेक अपघात झालेले होते. अपघातांत सांपडलेले लोक शिकलेले होते. कलकत्ता पोलिसांनीं आतां वाहतुकीचे नवे नियम जारी केले आहेत. हे नियम मोडल्याबद्दल पोलिसांनीं एका आठवड्यांत २०० पादचारी, ३०० सायकल स्वार आणि बरेच मोटारवाले ह्यांना अटक केली.

### रशियासाठी जपानी तेलवाहू बोटी

रशिआच्या आयात संघटनेनें जपानकडून ६ मोठ्या तेलवाहू बोटी खरेदी करण्याचें ठरविलें आहे. बोटी बांधण्याचें काम टोकिओमधील एका बड्या भारी औद्योगिक यंत्रें तयार करणाऱ्या कारखान्यानें स्वीकारलें आहे. बोटी बांधण्याच्या कामांत हा कारखाना अग्रेसर समजला जातो. रशियानें मागणी केलेल्या प्रत्येक बोटीचें वजन ३५ हजार टन असेल आणि किंमत सुमारें ५८ लाख डॉलर्स असेल. उत्तर पॅसिफिक समुद्रांत तेलाची वाहतूक करण्यासाठी त्या बांधण्यांत येणार असल्यानें समुद्रांतील बर्फखंडापासून संरक्षण करण्यासाठी विशेष लक्ष देण्यांत आलें आहे. बोटींपैकी एक बोट बांधण्याचें काम सुरू झालें आहे. सुमारें तीन महिन्यांत ती रशियाच्या स्वाधीन केली जाईल.

### आंध्र राज्यांतील दारू गाळण्याचे कारखाने

आंध्र राज्यांत दारू गाळण्याचे दोन कारखाने असून त्यांत रम, व्हिस्की व ब्रँडी तयार करण्यांत येते. ह्या कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढविण्यांत येणार आहे. शिवाय दारूची प्रत सुधारण्यासाठी स्कॉटलंडमधील एका तज्ज्ञाचें साह्यहि घेण्यांत येणार आहे. आंध्र राज्यांत खाजगी रीत्या दारू तयार करण्याची परवानगी देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. आंध्रांत दारू तयार करण्याच्या व्यवसायाला चांगलें भवितव्य आहे. म्हैसूर राज्याला लागून असलेल्या चित्तूर ह्या एकाच जिल्ह्यांत सुमारें १५ हजार एकरांत द्राक्षांची लागवड करण्यांत येते. त्यामुळें द्राक्षांपासून दारू गाळण्याचा धंदा काढणें सहज शक्य आहे.

### कार्ल मार्क्स्‌च्या जीवनावर चित्रपट

शास्त्रीय समाजवादाचा आद्य संस्थापक कार्ल मार्क्स् ह्यांच्या जीवनावर एक दीर्घ चित्रपट काढण्याचें रशियानें ठरविलें आहे. चित्रपटाचे तीन भाग करण्यांत येणार आहेत. चित्रपट रंगीत काढण्यांत येणार असून त्यामधील बऱ्याच भागाचें चित्रीकरण लंडनमध्यें करावें लागेल. त्याशिवाय पॅरिस व ब्रुसेल्समध्येंहि कांहीं भाग चित्रित करावा लागेल. कारण, ह्या दोन शहरांत कांहीं काळ घालवून १८४९ सालीं मार्क्स् राजकीय निर्वासित म्हणून लंडनला आला. १८८३ सालीं तो निधन पावला. त्याचें थडगें लंडनमधील हायगेट स्मशानभूमींत आहे. कम्युनिस्ट मतप्रणालीविषयीं आदर असणारे परदेशीय लोक लंडनला आले तर ते ह्या स्मशानभूमीला भेट दिल्याशिवाय राहात नाहींत.

### पुढाऱ्यांना सल्ला

एका रोमन तत्त्ववेत्त्यानें २,००० वर्षांपूर्वी यशस्वी राजकीय पुढारी होण्यासाठी खालीलप्रमाणें सल्ला दिलेला आढळतो : " पुढाऱ्याला तीन गोष्टी करतां आल्या पाहिजेत. ( १ ) विजयी बाजूला नेहमीं असणें, ( २ ) पराभव पावणाऱ्या बाजूकडून सुटका करून घेणें, ( ३ ) विजयी आणि पराभूत दोन्ही बाजूंना आपण त्यांचेच बाजूचे असल्याचें वाटणें. पराभूत बाजूच्या कशासाठी ? कारण, आजचा पराभूत उद्यांचा विजयी व्हायचा ?

### प्राचीन देवालयें वांचविण्यांत येणार

इजिप्तमध्यें बांधण्यांत येत असलेल्या आस्वानच्या धरणांत अबुसिंबेल हीं प्रसिद्ध प्राचीन देवालयें बुडणार आहेत. खडकांत कोरण्यांत आलेलीं हीं देवालयें वांचविण्यासाठी संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक संघटनेनें प्रयत्न चालविले होते. परंतु ह्यासाठी ४ कोटी डॉलर्सच्या आंतबाहेर खर्च येणार होता. आतां खर्चाची तरतूद होण्याची खात्री वाटत असल्यानें देवळें विभागशः जागेवरून हलवून उंच ठिकाणीं पुन्हां उभारण्यांत येणार आहेत. एकूण खर्चापैकी १·१५ कोटी डॉलर्स इजिप्त देणार असून बाकीची रक्कम वर्गणीनें जमविण्यांत येणार आहे. हीं देवळें इजिप्तच्या संस्कृतीचें प्रतीक समजलीं जातात.

### प्रमुख शहरांतील फुलांचा प्रचंड खप

इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें मुंबई, कलकत्ता, बंगलोर, मद्रास आणि दिल्ली येथील फुलांच्या खपाविषयीं आंकडेवारी जमा केली आहे, ती उद्बोधक आहे. मुंबई शहरांत दररोज एक लक्ष रुपयांचीं फुलें खपतात. गजरे, वेण्या, हार, देवासाठी पुडे, ह्यांसाठी मुख्यतः त्यांचा उपयोग होतो. कलकत्त्यामधील फुलांचा वार्षिक खप २·२१ कोटी रुपयांचा आहे; मद्रास आणि बंगलोर ह्यांचे तत्सम आंकडे १·५१ कोटी रुपये आणि १·६४ कोटी रुपये आहेत. दिल्लीमधील वार्षिक खप ४५ लक्ष रुपयांचा आहे. सौंदर्यवर्धनासाठी फुलांचा वापर मुंबईंत सर्वांत मोठ्या प्रमाणावर केला जातो; बाकीच्या शहरांतून पूजेसाठीच मुख्यतः फुलें विकत घेतलीं जातात.

### जपानची भारताला मदत

भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील विकासकार्याला मदत म्हणून जपान आणखी २८·५ कोटी रुपयांचें कर्ज देणार आहे. ह्या कर्जावरील व्याजाचा दर ५·७ टक्के राहील. पूर्वी देण्यांत आलेल्या कर्जावरील व्याजाचा दर ६ टक्के आहे. नवीन कर्जाची फेड १५ वर्षांत करावयाची आहे. पहिला हप्ता ५ वर्षांनंतर द्यावयाचा आहे. जपाननें भारताला इतर धनको देशांच्या मार्फत १०·५ कोटी डॉलर्स कर्ज आतांपर्यंत दिलेलें आहे. त्याशिवाय आणखीहि कांहीं कर्जें भारताला प्रत्यक्षच दिलेलीं आहेत.

### कोलार सोन्याच्या खाणींचें भवितव्य

म्हैसूर राज्यांतील कोलार सोन्याच्या खाणींचा उत्पादनखर्च कमी करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत तर त्या खाणी बंद ठेवाव्या लागतील, असें अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांनीं मद्रास येथील एका भाषणांत स्पष्ट केलें. सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत—तोळ्याला रु. ६२=५० आहे, तर कोलारच्या सोन्याचा उत्पादन खर्च तोळ्याला रु. १२८ आहे. म्हणजे, जागतिक बाजारभावापेक्षा तो दुप्पट आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.